कार्यालय नगर परिषद, बुटीबोरी ता.व जिल्हा नागपूर

सुधारीत आदेश

जा.क्र./न.प.वा./बां.वि./158/2024
कार्यालय नगर परिषद बुटीबोरी,
जिल्हा नागपूर.
दिनांक :- 14/02/2024

महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 45 व महाराष्ट्र नगरपालिका नगर पंचायती व औद्यागीक वसाहती अधिनियम 1965 चे कलम 189 अन्वये **निवासी / वाणिज्य ईमारत बांधकाम मंजुरी आदेश**

प्रती,
श्री. सलमा अकिल सय्यद,
वार्ड क्र. 3, बुटीबोरी,
जि. नागपूर.

विषय :- निवासी व वाणिज्य ईमारत बांधकाम परवानगी बाबत.
संदर्भ :- 1. आपला अर्ज क्र. 32 दि. 21/02/2023
2. जा. क्र. 252 दि. 28/02/2023 ला देण्यात आलेला बांधकाम परवानगी आदेश.
3. आपला सुधारित परवानगीचा अर्ज क्र. 104 दि. 24/01/2024.

वरील विषयाचे अनुषंगाने आपल्या सुधारित परवानगीचा अर्जानुसार प्लॉट क्र. 02 मौजा रेंगापार चे जागेवर प्लॉटचे एकूण क्षेत्रफळ 830.25 चौ. मी जागेवर सुधारीत वाणिज्य व निवासी ईमारत बांधकाम वाणिज्य तळमजला 90.23 चौ.मी. निवासी पहिला मजला 467.17 चौ. मी. निवासी दुसरा मजला 467.17 चौ.मी. निवासी तिसरा मजला 467.17 चौ.मी. चौथा मजला 467.17 चौ.मी. सोबतचे मंजुर नकाशाप्रमाणे बांधकाम करण्यास खालील अटी व शर्तीला अधिन राहुन परवानगी देण्यात येत आहे. उक्त बांधकामा बाबत बांधकाम परवानगी शुल्क रूपये 1496750/- पावती क्र. 2948 दि. 27/02/2023, नुसार न.प.फंडात जमा करण्यात आलेले आहे.

अटी व शर्ती

1) बांधकामास प्रारंभ परवाना आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन एक वर्ष पर्यंत वैध राहील. त्यानंतर आपणास अर्ज करून नुतनीकरण करून घ्यावे लागेल.
2) नकाशा मंजुर झाल्यानुसार फक्त जोता लेव्हलपर्यंतच बांधकामास परवानगी याद्वारे देण्यांत येत आहे. इमारतीचे जोता बांधकाम नकाशाप्रमाणे पूर्ण झाल्यानंतर सदर बांधकामावर देखरेख करणाऱ्या वास्तुतज्ञ/अभियंताकडून परिशिष्ट 'एफ' मध्ये या कार्यालयास कळवावे, त्यानंतर प्रत्यक्ष मौका पाहणी करून मंजुर नकाशा नुसारच जोत्याचे बांधकाम झाले असल्यास उर्वरीत बांधकामास परवानगी देण्यात येईल.मंजुर नकाशाप्रमाणे जोता बांधकाम झाले नसल्यास पुढील

बांधकामास परवानगी देण्यात येणार नाही. व केलेले बांधकाम अनधिकृत समजण्यात येवुन कायदेशीर फौजदारी कार्यवाही करण्यात येईल.

3) जोत्याचे बांधकाम सोबतचे मंजुर नकाशाप्रमाणे 1958.91 चौ.मी. क्षेत्रातच असावे मंजुरी व्यतिरिक्त जादा बांधकाम करू नये, जादाचे बांधकाम करावयाचे झाल्यास मंजुरी घेवुनच करावे. अन्यथा परवानगी शिवाय अथवा परवानगी दिलेल्या पेक्षा जादा जागेत बांधकाम केल्यास महा. प्रादेशिक व नगर रचना अधि. 1966 चे कलम 52 व 53 नुसार नगर परिषदे मार्फत कार्यवाही केले जाईल.

4) शेजाऱ्याचे जागेवर/रस्त्यावर/बोळ/गटार यावर अतिक्रमण होणार नाही. त्याची दक्षता घ्यावी, तसे केल्यास केलेले बांधकाम पाडुन घ्यावे लागेल.

5) नकाशात दर्शविल्या प्रमाणे प्लॉटचे सभोवताल योग्य समास सोडुनच बांधकाम करावे. न.प. गल्ली/रस्त्याच्या दिशेने योग्य अंतर सोडुनच बांधकाम करावे.

6) आवर भिंत बांधकामास शेजाऱ्याचे/शासकीय जागेवर दारे, खिडक्या, गटार वा इतर ओपनिंग ठेवु नये. आवार भिंतीची उंची दिड मिटर पेक्षा वाढवु नये.

7) आपल्या इमारतीचे सांडपाण्याचे रितसर व्यवस्था आपण करावी व त्यापासुन कुणास त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.

8) बांधकाम मटेरीयलपासुन शेजारी किंवा रहदारीस त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी रस्त्यावर मटेरीयल राहील्यास न.प.मार्फत कधीही मटेरीयल जप्त करण्यात येईल.

9) आपणांकडुन प्राप्त दस्ताऐवजावर परवानगी देण्यात आलेली आहे. दिलेल्या परवानगीबाबत कोणत्याही प्रकारचे आक्षेप आल्यास व वाद निर्माण झाल्यास आपले सुरू असलेले काम बंद करावे लागेल आणि होणाऱ्या न्यायालयीन प्रकरणी व इतर बाबीस न.प. जबाबदार राहणार नाही. याची वयक्तिक जबाबदारी आपली राहील.

10) आपले इमारतीचे जोत्याचे बांधकाम (बेसमेंट) जमीनीपासुन कमीत कमी मंजुर नकाशाप्रमाणे 0. 60 मि. वर असलेच पाहीजे.

11) नियमीत बांधकाम भुकंपरोधक करण्याचे दृष्टीने आपणांस बांधकाम चालु करण्यापुर्वी सक्षम स्थापत्य अभियंताकडुन भारतीय मानक संस्थेने प्रमाणीत केल्याप्रमाणे नकाशे व आराखडे सादर करणे बंधनकारक राहील, आणि तसेच आर सी सी डीझायनर कडुन कॉलम, बीम व स्लॅपचे डीझाईन (भुकंप रोधक) करूनच सक्षम स्थापत्य अभियंताच्या देखरेखी खालील स्लॅब व इतर बांधकाम पुर्ण करावे लागेल.

12) सदहु बांधकाम चालु असतांना आपण 02,05,10,11 नुसार कारवाई केल्याचे कळविल्यानंतर नगरपालिकेचे नगर अभियंता हे जेव्हा जेव्हा कामास भेट देतील तेव्हा तेव्हा वरीलप्रमाणे होत असलेल्या कामाची नोंद वही ठेवुन तशी नोंद घ्यावी. आणि त्यांनी दिलेल्या सुचनेनुसार पुढील बांधकाम करणे बंधनकारक राहील.

13) वरील प्रमाणे अटी व शर्तीची पुर्तता न केल्यास भुकंपाचे वेळी व कच्चे बांधकाम केल्यामुळे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे व सदरील बांधकामामुळे दुर्घटना होवुन कोणतीही जिवीत किंवा वित्त हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या वर राहील.

14) वरील अटीचे उल्लंघन झाल्यास केलेले बांधकाम अवैध समजण्यात येईल, आणि आपणांस दिलेली बांधकाम परवानगी रदद करण्यात येईल. या करीता सर्व अटीचे पालन करण्याचा शर्तीवरच आपणास बांधकाम परवानगी देण्यात येत आहे.

15) शासनाचे आदेशानुसार बांधकाम करतांना फ्लाय ॲश विटांचा वापर करावा.

16) छतावरील पावसाचे पाणी (Rain Water Harvesting) साठवणुकीची स्वतंत्र व्यवस्था करावी.

17) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रं. अपाऊ 2007/प्र.क्रं. 590/उर्जा 7 दि.11/9/2007 व नगरपरिषद साधारण सभा राव क्रं. दि.5/8/2008 अ नुसार शासनाने सौर उर्जेवरील गरम पाण्याचे स्वतंत्र संच स्वखर्चाने न.प.क्षेत्रातील नागरीकांना बंधनकारक केले आहे.तरी त्याप्रमाणे आपण कार्यवाही करावी.

वरील अटीचे पालन न केल्याचे दिसुन आल्यास दिलेली बांधकाम परवानगी ही रद्द करण्यात येईल.

सहपत्रः- बांधकाम मंजुरी नकाशाची एक प्रत.

मुख्याधिकारी
मुख्य नगर परिषद बुटीबोरी
नगरपरिषद बुटीबोरी

प्रतिलिपी :- 1) श्री. गौतम सोनटक्के रा. बुटीबोरी.

उपरोक्त दिलेली परवानगी **सलमा अकिल सय्यद** यांनी सादर केलेल्या नकाशा व आराखडयानुसार सक्षम अभियंताच्या देखरेखीखाली भारतीय मानक संस्थेने विहित केलेल्या तरतुदीनुसार चांगल्याप्रतीचे साहित्य वापरून बांधकाम करीत असल्याबाबत दर पंधरा दिवसाला भेट देवुन खात्री करून घ्यावी. भारतीय मानक संस्थेने विहित केलेल्या तरतुदीनुसार बांधकाम होत नसल्यास संबधिताचे बांधकाम बंद करून पुन्हा मानक संस्थेने दिलेल्या तरतुदीनुसार जबाबदारीने दुरूस्ती करून घ्यावी.

2) मुख्य कर संग्रहक नगर परिषद बुटीबोरी.

नविन बांधकामची प्रत्यक्ष तपासणी करून नियमानुसार नोंद घेवून कर आकारणीची कार्यवाही करावी.

मुख्याधिकारी
मुख्य नगर परिषद बुटीबोरी
नगरपरिषद बुटीबोरी